RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ३५] गुरुवार, मे १४, २०२६/वैशाख २४, शके १९४८ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ५२

प्राधिकृत प्रकाशन

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र. १ उरण यांजकडून

अधिसूचना

भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक भूसंपादन/टे-८/जुई/एसआर २८/२०२१/२०२६.—ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग भिंगारी पनवेल यांचेमार्फत चिरनेर बाह्यवळण रस्त्यासाठी मौजे जुई, ता.उरण, जि.रायगड येथील जमीन संपादित करावयाची आहे. सदर संपादनासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र.१ उरण, ता.उरण, जि.रायगड यांचे कार्यालयाकडून संपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १ उरण यांनी अधिसूचना, क्र.भूसंपादन/कात-२/जुई/सीआर २८/२०२१ दि.०७/०७/२०२३ अन्वये कलम ११ ची अधिसूचना "आपले साम्राज्य" मध्ये दि. १३ जुलै २०२३ रोजी पृष्ठ क्रमांक ७ आणि " रत्नागिरी रायगड टाईम्स " मध्ये दिनांक १३ जुलै २०२३ रोजी पृष्ठ क्रमांक ५ वर प्रसिद्ध झाली आहे. यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

त्याअर्थी, मी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १ उरण भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) हा राज्यात प्रयुक्त असताना त्याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये अहवाल पाठविलेल्या प्राधिकाऱ्याचा अहवाल विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत माझी खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

त्याअर्थी, भूमीसंपादन कायदा, २०१३ चे कलम १९ अन्वये ची घोषणा प्रसिद्धी कामी मुदतवाढ जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग कार्यालयाकडील पत्र क्र.भूसंपादन/टे-६/जुई व कळंबुसरे कलम १९/२०२४ दि. १८/०९/२०२४ अन्वये १२ महिन्याकरिता, पत्र क्र. भूसंपादन/टे-६/जुई व कळंबुसरे कलम १९/२०२५ दि.१५/०९/२०२५ अन्वये सहा महिन्याकरिता व पत्र क्र.भूसंपादन/टे-६/चिरनेर आवरे बा.र.मुदतवाढ/२०२५ दि.१६/०४/२०२६ अन्वये उक्त अधिसूचनेस दिनांक.३०/०९/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, अनूसुची तीन मध्ये अधिक तपशिलावर वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून "निरंक" निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पूनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनूसुची चार मध्ये "निरंक" असा विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे. उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व कार्यवाहीच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्याकरिता संपादन अधिनियमाचे कलम ३ च्या खंड (छ) याद्वारे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र.१ उरण,ता.उरण, जि. रायगड यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्याप्रमाणे त्यांना उक्त जमिनीच्या संबंधातील संपादनाची कार्यवाही या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी, असे निर्देश देण्यात येत आहे.

अनुसूची- एक

(संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन)

मौजे जुई, ता. उरण, जिल्हा रायगड

अ. क्र. (१)	गावाचे नाव (२)	स.नं./ग.नं. (३)	संपादीत क्षेत्र हे.आर (४)
१	जुई	१६४/२/२ पै	०-०६-६७
२	जुई	१६४/२/४ पै	०.०५-०१
३	जुई	१६४/२/६ पै	०-०५-१३
४	जुई	१६४/२/७ पै	०-०३-२४
५	जुई	१६९/१४ पै	०-०७-५८
६	जुई	१६८ पै	०-३१-७४
७	जुई	१६७/१ पै	०-०२-८३
		एकूण	**०-६२-२०**

अनुसूची- दोन

सार्वजनिक प्रयोजन स्वरुपाचे विवरण

प्रकल्पाचे नाव	रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी साखळी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे भूसंपादन.
प्रकल्पाचे वर्णन	रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी साखळी क्र.१/०० ते १/९०० मधील संपादन मौजे जुई,ता.उरण,जि.रायगड येथील जमीन.
समाजाला मिळणारे लाभ	मौजे जुई,ता.उरण येथील जमीन रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर बाह्यवळण आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन केल्याने व रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर चिरनेर ते आवरे येथील लोकांना ये जा करण्यासाठी सोईचे होणार आहे.

अनुसूची-तीन

(पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन)

गावाचे नाव जुई, ता. उरण, जि. रायगड

अनुक्रमांक	भूमापन क्रमांक गट क्रमांक	क्षेत्र (हेक्टरमध्ये)
निरंक		

अनुसूची-चार

सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा सारांश

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१२३, दिनांक १३ जून २०२३ अन्वये भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १० क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ आणि प्रकरण ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिली आहे.

टीप :- नकाशे पाहण्यासाठी कार्यालयात उपलब्ध आहेत.

अविशकुमार सोनोने,
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
मेट्रो सेंटर क्र.१ उरण.

उरण,
दिनांक १४ मे २०२६.

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र. १ उरण यांजकडून

अधिसूचना

भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक भूसंपादन/टे-८/कळंबुसरे/एसआर २९/२०२१/२०२६.—ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग भिंगारी पनवेल यांचेमार्फत चिरनेर बाह्यवळण रस्त्यासाठी मौजे कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड येथील जमीन संपादित करावयाची आहे. सदर संपादनासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र.१ उरण, ता.उरण, जि.रायगड यांचे कार्यालयाकडून संपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १ उरण यांनी अधिसूचना, क्र.भूसंपादन/कात-२/कळंबुसरे/सीआर २९/२०२१ दि.०७/०७/२०२३ अन्वये कलम ११ ची अधिसूचना " दै. कृषीवल" मध्ये दि. १३ जुलै २०२३ रोजी पृष्ठ क्रमांक ७ आणि " दै. रामप्रहर" मध्ये दिनांक १३ जुलै २०२३ रोजी पृष्ठ क्रमांक २ वर प्रसिद्ध झाली आहे. यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

त्याअर्थी, मी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १ उरण भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) हा राज्यात प्रयुक्त असताना त्याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये अहवाल पाठविलेल्या प्राधिकाऱ्याचा अहवाल विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत माझी खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

त्याअर्थी, भूमीसंपादन कायदा २०१३ चे कलम १९ अन्वये ची घोषणा प्रसिद्धी कामी मुदतवाढ जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग कार्यालयाकडील पत्र क्र.भूसंपादन/टे-६/जुई व कळंबुसरे कलम १९/२०२४ दि.१८/०९/२०२४ अन्वये १२ महिन्याकरिता,पत्र क्र. भूसंपादन/टे-६/जुई व कळंबुसरे कलम १९/२०२५ दि. १५/०९/२०२५ अन्वये सहा महिन्याकरिता व पत्र क्र.भूसंपादन/टे-६/चिरनेर आवरे बा.र.मुदतवाढ/२०२५ दि.१६/०४/२०२६ अन्वये उक्त अधिसूचनेस दिनांक.३०/०९/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, अनूसुची तीन मध्ये अधिक तपशिलावर वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून "निरंक" निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पूनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनूसुची चार मध्ये "निरंक" असा विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे. उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व कार्यवाहीच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्याकरिता संपादन अधिनियमाचे कलम ३ च्या खंड (छ) याद्वारे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र.१ उरण,ता.उरण, जि. रायगड यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्याप्रमाणे त्यांना उक्त जमिनीच्या संबंधातील संपादनाची कार्यवाही या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी, असे निर्देश देण्यात येत आहे.

अनुसूची- एक

(संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन)

मौजे कळंबुसरे, ता. उरण, जिल्हा रायगड

अ. क्र. (१)	गावाचे नाव (२)	स.नं./ग.नं. (३)	संपादीत क्षेत्र हे.आर (४)
१	कळंबुसरे	३८/३ ब पै	०-००-६८
२	कळंबुसरे	३८/३ क पै	०-०६-४४

अ. क्र. (१)	गावाचे नाव (२)	स.नं./ग.नं. (३)	संपादीत क्षेत्र हे.आर (४)
३	कळंबुसरे	३८/५ पै	०-००-६४
४	कळंबुसरे	३८/६ पै	०-००-७१
५	कळंबुसरे	३८/८ पै	०-०५-८४
६	कळंबुसरे	११ पै	०-२६-६८
७	कळंबुसरे	१२/१ ते ५ पै	०-०४-११
८	कळंबुसरे	१२/८ पै	०-००-०३
९	कळंबुसरे	१३/१ पै	०-१५-११
१०	कळंबुसरे	१३/५ पै	०-००-९६
११	कळंबुसरे	१३/६ पै	०-०६-९०
१२	कळंबुसरे	१३/७ पै	०-०२-२५
१३	कळंबुसरे	१३/८ पै	०-०३-२२
१४	कळंबुसरे	६ पै	०-००-०३
१५	कळंबुसरे	८ पै	०-०६-८३
१६	कळंबुसरे	३/१ पै	०-०६-८९
१७	कळंबुसरे	३/३ पै	०-०१-६४
१८	कळंबुसरे	३/४ पै	०-०१-२५
१९	कळंबुसरे	४ पै	०-०४-०६
२०	कळंबुसरे	५ पै	०-०७-०७
२१	कळंबुसरे	१२२/२ पै	०-१०-३९
		एकूण	**१-११-७३**

अनुसूची- दोन

सार्वजनिक प्रयोजन स्वरुपाचे विवरण

प्रकल्पाचे नाव	रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी साखळी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे भूसंपादन.
प्रकल्पाचे वर्णन	रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी साखळी क्र.१/०० ते १/९०० मधील संपादन मौजे कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड येथील जमीन.
समाजाला मिळणारे लाभ	मौजे कळंबुसरे,ता.उरण येथील जमीन रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर बाह्यवळण आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन केल्याने व रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर चिरनेर ते आवरे येथील लोकांना ये जा करण्यासाठी सोईचे होणार आहे.

अनुसूची-तीन

(पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन)

गावाचे नाव कळंबुसरे,ता. उरण, जि. रायगड

अनुक्रमांक	भूमापन क्रमांक, गट क्रमांक	क्षेत्र (हेक्टरमध्ये)
निरंक		

अनुसूची–चार

सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा सारांश

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१२३, दिनांक १३ जून २०२३ अन्वये भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १० क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ आणि प्रकरण ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिली आहे.

टीप :– नकाशे पाहण्यासाठी कार्यालयात उपलब्ध आहेत.

अविशकुमार सोनोने,
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
मेट्रो सेंटर क्र. १ उरण.

उरण,
दिनांक १४ मे २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.